**राज्य सांस्कृतिक धोरण, २०१०**
**"खादय संस्कृती कोश" या प्रकल्पास मान्यता देणेबाबत.**

मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : रासांधो १०११/ प्र.क्र. ८४/२०११/ भाषा-३
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६ जानेवारी, २०१२

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्राला स्वत:ची अशी विभागवार खादयसंस्कृती आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांत व महाराष्ट्राबाहेरील महत्वाच्या ठिकाणी विविध पदार्थ सहजपणे उपलब्ध अशी लोकांची मागणी असते. शासकीय अतिथीगृहे, शासकीय कार्यालये, तसेच आमदार निवास, शैक्षणिक संकुले, पर्यटनस्थळे, रेल्वे व एस.टी.स्थानके, विमानतळ इ.ठिकाणी असलेल्या उपहारगृहामध्ये हे खादयपदार्थ मिळावेत याकरीता संबंधितांना सूचना देणे, तसेच हे खादयपदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षण देण्याविषयी महाराष्ट्रातील केंटरींग कॉलेजांना सूचित करणे या संदर्भात समन्वय साधण्याकरीता राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० मध्ये अंतर्भुत करुन देणारा "खादय संस्कृती कोश प्रकल्प " तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

विचाराअंती शासन या शासन निर्णयान्वये "खादय संस्कृती कोश प्रकल्प " या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता व कोशाकरीता येणारा रुपये २,००,०००/- (रुपये दोन लक्ष फक्त) इतक्या होणाऱ्या खर्चास मंजूरी देत आहे. सदर प्रकल्प महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या ज्येष्ठ सदस्या श्रीमती अनुपमा उजगरे यांच्या कडे सोपविण्यात आला आहे . सदर रु.२,००,०००/- एवढा खर्च सन २०११-१२ या आर्थिक वर्षात करणेस पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे :-

(अ) खादय संस्कृती कोशाची निर्मिती करण्यास एक ते दीड वर्षांची कालमर्यादा निश्चित करण्यात यावी.

(ब) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी प्रकल्पांच्या लेखनाबाबत श्रीमती अनुपमा उजगरे यांच्या बरोबर सामंजस्य करार करावा व कराराच्या वेळेस त्यांना नाममात्र मानधन देण्यात यावे व जसजसे लेखन मंडळाला प्राप्त होईल त्याप्रमाणे तसतशी मानधनाची रक्कम अदा करण्यात यावी.

(क) खादय संस्कृती कोशाकरीता मंडळाकडून खर्च करण्यात आलेल्या रकमेचे विनियोग प्रमाणपत्र तात्काळ शासनास सादर करणे आवश्यक राहील.

३. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर प्रकल्पावर होणारा खर्च, मागणी क्रमांक झेडएफ- ०२, २२०५- कला व संस्कृती प्रचालन, (०१) राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (०२) (२२०५ ३२१४) ३१ - सहायक अनुदाने (वेतनेतर) योजनांतर्गत " या लेखाशिर्षाखाली संबंधित वित्तीय वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या मंजूर तरतूदीतून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-४, परिच्छेद-२७ (२) मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६३६१८११३३)

**(ललिता शि. देठे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
३. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
६. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरिक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई
७. वित्त विभाग (व्यय ४/सेवा ५/विनियम), मंत्रालय, मुंबई,
८. निवड नस्ती